accelya

# ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** ५ वा आणि ६ वा मजला, बिल्डींग नं. ४, रहेजा वुड्स, रिव्हर साईड २५ए, वेस्ट ॲव्हेन्यू, कल्याणी नगर, पुणे ४११००६
**फोन :** +९१ २० ६६०८३७७७ **ई-मेल:** accelyaindia.investors@accelya.com
**संकेतस्थळ :** w3.accelya.com **सीआयएन नं.:** एल७४१४०पीएन१९८६पीएलसी०४१०३३

## सूचना

**(कंपनीच्या समभाग धारकांच्या महितीसाठी)**

**विषय: गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफ) यांच्या लाभांश खात्यात कंपनीच्या समभागांचे हस्तांतरण**

याद्वारे सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की कंपनी कायदा २०१३ चे कलम १२४(६) तसेच वेळोवेळी सुधारित केलेल्या गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (अकौंटिंग, लेखा परीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम २०१६ चा नियम ६ (नियम) यांच्या तरतुदींनुसार २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठीचा घोषित अंतरिम लाभांश, जो सात वर्षांच्या कालावधीसाठी दावा न करता शिल्लक राहिला आहे, तो आयईपीएफ च्या खात्यामध्ये हस्तांतरित करण्यासाठी देय होणार आहे. ज्या समभागांवर सलग सात वर्षे लाभांशाचा दावा केला गेला नाही ते समभाग देखील नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार हस्तांतरित केले जाणार आहेत.

नियमांच्या तरतुदीं नुसार कंपनीने २१ डिसेंबर २०२२ संबंधित भागधारकांशी स्पीड पोस्टद्वारे वैयक्तिकरित्या या विषयी कळविले असून आयईपीएफकडे हस्तांतरित होण्यासाठी देय असलेल्या समभागांचा तपशील कंपनीच्या **w3.accelya.com** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी न मिळवलेल्या लाभांशाचे तपशील आणि आयईपीएफकडे हस्तांतरित केल्या जाणाऱ्या समभागांची पडताळणी करण्यासाठीची माहिती **https://ris.kfintech.com/services/IEPF/IEPFUnpaidQry.aspx?q=%2fYRi1%2bG2efI%3d** या वेबलिंकवर पहावी.

संबंधित भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी ११ मार्च २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठीच्या घोषित अंतरिम लाभांशाचा दावा करण्याची कार्यवाही करावी. तसे न झाल्यास, कंपनी नियमांचे पालन करण्याच्या दृष्टिकोनातून, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीचा अंतरिम लाभांश आणि त्यांचे संबंधित समभाग पुढील सूचनेशिवाय आयईपीएफकडे हस्तांतरित करेल.

संबंधित भागधारक ज्यांच्याकडे प्रत्यक्ष स्वरुपात समभाग आहेत, आणि जे आयईपीएफकडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत, अशा संबंधित भागधारकांनी लक्षात घ्यावे की कंपनी अशा समभागांसाठी आयईपीएफकडे हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करणार असून, त्यानंतर डिपॉझिटरीजना कॉर्पोरेट कृती द्वारे सुचित करुन त्यांचे डीमॅट मध्ये रूपांतर करून मग आयईपीएफकडे हस्तांतरित करणार आहे. तसे झाल्यानंतर मूळ भागधारकाच्या नावाने नोंदणीकृत असलेले मूळ शेअर सर्टिफिकेट आपोआप रद्द होईल आणि ते व्यवहारयोग्य राहणार नाहीत. डीमॅट स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या भागधारकांनी लक्षात घ्यावे की आयईपीएफच्या डीमॅट खात्यामध्ये समभाग हस्तांतरण करण्यासाठी कंपनी कॉर्पोरेट कृतीद्वारे डीपॉझिटरीस सुचित करेल.

संबंधित भागधारकांनी पुढे लक्षात घ्यावे की वरील लिंकवर उपलब्ध आणि प्रसिद्ध केलेला तपशिल हा आयईपीएफकडे समभाग हस्तांतरण करण्याच्या उद्देशाने कंपनीने डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्र जारी केल्याच्या संदर्भात ती पुरेशी सूचना मानली जाईल.

कृपया लक्षात घ्यावे की दावा न केलेली लाभांश रक्कम आणि आयईपीएफकडे हस्तांतरित केलेल्या समभागांच्या संदर्भात, हस्तांतरण झाल्यानंतर, कंपनीकडे कोणताही दावा करता येणार नाही. हस्तांतरण झाल्यानंतर नियमांमध्ये विहित प्रक्रियेचे पालन करून भागधारक आयईपीएफकडे आपला लाभांश आणि त्यांचे समभाग यांचा दावा करू शकतात.

वरील विषयातील कोणत्याही प्रश्नांसाठी भागधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, केफीन टेक्नॉलॉजीज् लिमिटेड यांच्याकडे श्री मोहम्मद मोहसीनुद्दीन, वरिष्ठ व्यवस्थापक, यांच्याशी ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१-३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा हैदराबाद-५०००३२. दूरध्वनी: ०४० ६७१६ १५६२ ईमेल आयडी: mohsin.mohd@kfintech.com, येथे संपर्क साधावा.

**ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड** साठी

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** २७ डिसेंबर, २०२२

**निनाद उमराणीकर**
कंपनी सचिव